केंद्र शासनाकडून राज्यास भांडवली गुंतवणुकीसाठी कर्ज स्वरुपात विशेष अर्थसहाय्य योजना अंतर्गत (बिनव्याजी कर्ज) कृषि विद्यापीठांना एकूण रु.१४८.३६ कोटी निधी वितरीत करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय, क्रमांक: कृषिवि-३७२६/प्र.क्र.४३/ई-१६००८७३/७-अे**

**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : २०/०३/२०२६**

संदर्भ:-

१) संचालक (डिजीटल), केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण विभाग यांचे क्र.Z-११०२१/७/ २०२५-Digital Agriculture- part (४) FTS No.१८३२३०, दिनांक २६.०२.२०२६ रोजीचे पत्र.

२) वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१४/२०२६/व्यय-१,दि.०९.०३.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.३३/ २०२६/अर्थबळ, दि.१६.०३.२०२६.

३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.: पुनर्वि-२४२६/प्र.क्र.४१ (१)/२-अे,दि.२०.०३.२०२६.

प्रस्तावना:-

विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजना २०२५-२६ अंतर्गत ॲग्रिस्टॅक योजनेशी संलग्न शेतकरी संच निर्मिती यासंदर्भात सदर योजनेतंर्गत ३ रा व ४ था टप्पा पूर्ण झाल्याने राज्यास रु.८९३.४० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनाच्या व्यय विभागास प्रस्ताव सादर करण्यात आले असल्याचे संचालक (डिजीटल), केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांच्या संदर्भ क्र.१ येथील दि.२६.०२.२०२६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

विशेष अर्थसहाय्य योजनेसाठी सन २०२५-२६ करिता, कृषि विभागास भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना (५० वर्ष बिनव्याजी कर्ज) अंतर्गत कृषि विद्यापीठातील भांडवली प्रकल्पांच्या कामाकरीता व कृषि भवन, पुणे येथील इमारत बांधकामासाठी एकूण रु.२५२.२२ कोटी इतका निधी विशेष अर्थसहाय्य स्वरुपात प्राप्त झाला आहे.

सदर विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी कृषि विभागाच्या मागणी क्र.डी-३, लेखाशिर्ष २४१५ ००७२ अंतर्गत रु.१९७.६३४८ कोटी व लेखाशिर्ष २४१५ ०१०५ अंतर्गत रु.६४.७७२३ कोटी अशी एकूण रु.२६२.४०७१ कोटी इतक्या रकमेची तरतूद पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत केलेली आहे.

मागणी क्र.डी-३, महात्मा फुले कृषि विद्यापीठास सहायक अनुदान कार्यक्रम खर्च लेखाशिर्ष २४१५ ००७२ व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास सहायक अनुदान लेखाशिर्ष २४१५ ०१०५ अंतर्गत मंजूर झालेला निधी कृषि विद्यापीठातील ०९ भांडवली प्रकल्पाच्या कामांना व कृषि आयुक्तालय, पुणे अंतर्गत पुणे येथील कृषि भवन इमारत व आयुक्त कृषि यांचे निवासस्थान इमारत बांधकामासाठी वितरीत करण्याबाबत वित्त विभागाने संदर्भ क्र.२ अन्वये सूचित केले आहे.

त्यानुषंगाने कृषि विद्यापीठातील एकूण ०९ बांधकामांसाठी, केंद्र शासनाने भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजना सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर केलेला एकूण रु.१४८.३६ कोटी इतका निधी, कृषि विद्यापीठांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> :-

केंद्र शासनाच्या, राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत सन २०२५-२६ करीता मंजूर रु.२५२.२२ कोटी इतक्या रक्कमेमधून, कृषि विद्यापीठांतील खालील ०९ भांडवली प्रकल्प बांधकामांसाठी रु.१४८.३६ कोटी (अक्षरी रुपये एकशे अठ्ठेचाळीस कोटी, छत्तीस लाख) इतकी बिनव्याजी कर्जाची रक्कम रोखीने वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली या कृषि विद्यापीठांना सन २०२५-२६ या वर्षात पूरवणीमागणीद्वारे निधी अर्थसंकल्पीत झाला नसल्याने, या दोन कृषि विद्यापीठातील एकूण ३ भांडवली प्रकल्पाच्या कामांसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या लेखाशिर्ष २४१५ ००७२ अंतर्गत पूरवणीमागणीद्वारे अर्थसंकल्पीत झालेल्या निधीमधून पुर्नर्विनीयोजनाद्वारे लेखाशिर्ष अनुक्रमे (२४१५ ००९९) व लेखाशिर्ष (२४१५ ००८१) अंतर्गत ३५, भांडवली मत्ता या उपशिर्षाकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, नांदेड या महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामासाठी विद्यापीठाच्या लेखाशिर्ष (२४१५ ०१०५), ३१, सहायक

अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत पूरक मागणीद्वारे मंजूर झालेला निधी पुर्नवितरण करुन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

याबाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटी)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत निधी उपशिर्ष (३१, सहायक अनुदाने, वेतनेतर) + (३५, भांडवली मत्ता निर्मिती करीता अनुदान) | भांडवली प्रकल्पाचे नाव | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| अ) | | | | |
| १. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) | १९७.६३४८ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत मौजे काष्टी, ता.मालेगाव, जि.नाशिक येथील कृषि महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय आणि कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे. | ५६.७५ |
| २. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) | | महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत क्रांतीसिंह नाना पाटील अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, मौजे पेठ, ता.वाळवा, जि.सांगली या महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे. | १०.५७ |
| ३. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) | | महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय,पुणे येथील विविध इमारतींमध्ये आग नियंत्रण व अग्निसुरक्षा प्रणाली बसविणेकरीता. | ५.५४ |
| ४. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) | | महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे. | ७.०० |
| ५. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) पुर्नर्विनियोजनाद्वारे | | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्र,नागपूर या केंद्राच्या इमारतीचे बांधकाम करणे. | ६.०० |
| ६. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) पुर्नर्विनियोजनाद्वारे | | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शासकीय कृषि महाविद्यालय, बुलढाणा या महाविद्यालयाचे इमारत बांधकाम | ६.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | २४१५ ००७२ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) पुर्नर्विनियोजनाद्वारे | | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत विविध संशोधन केंद्रे व इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा व सी.सी.टी. व्ही. यंत्र बसविणेबाबत | ६.०० |
| | **एकूण- (अ)** | | | **९७.८६** |
| **ब)** | | | | |
| ८ | २४१५०१०५ (३५,भांडवली मत्ता निर्मितीकरीता अनुदान या उपशिर्षामधून) | ६४.७७२३ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे जिरेवाडी,ता.परळी वैजनाथ, जि. बीड. येथील कृषि महाविद्यालय व कृषि व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे | ४०.०० |
| ९ | २४१५ ०१०५ (३५) मधून रु.५.६७२३ व (३१) मधून पुर्नवितरणाद्वारे रु.४.८२७७ | | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय,नांदेड या महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे | १०.५० |
| | **एकूण- (ब)** | | | **५०.५०** |
| | **एकूण- (अ) + (ब)** | **२६२.४०७१** | | **१४८.३६** |

२. उक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च "मागणी क्र.डी-३, (००) (०६) महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ००७२), (००) (०७) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ००८१), (००) (०८) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ००९९) व (००) (०९) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान (कार्यक्रम) (२४१५ ०१०५)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सन २०२५-२६ करिता केंद्र शासनाने भांडवली गुंतवणूकीकरिता विशेष सहाय्य योजनेतंर्गत ज्या प्रकल्पांसाठी निधी मंजूर केला आहे, त्याच प्रकल्पासाठी व त्यातील प्रयोजनासाठीच निधी खर्च होईल, याची सर्व कृषि विद्यापीठांनी खबरदारी घ्यावी. सदर कर्जाचा विनियोग करुन तात्काळ उपयोगिता प्रमाणपत्र वित्त विभागास सादर करणे आवश्यक असल्याने, विद्यापीठांनी सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी तात्काळ खर्च करुन, त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

४. डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गतच्या आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्र, नागपूर या प्रकल्पाच्या बांधकामाकरिता वितरीत केलेला निधी नियंत्रक,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई यांना ठेव अंशदान तत्त्वावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

५. केंद्र शासनाकडून विशेष अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०२५-२६ करिता राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी मंजूर झालेली बिनव्याजी रक्कम दिनांक ३१ मार्च, २०२६ पूर्वी खर्च करणे बंधनकारक आहे.

६. सहायक लेखाधिकारी,महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी, सहायक लेखाधिकारी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, सहायक लेखाधिकारी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला व सहायक लेखाधिकारी,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेले अनुदान, कृषि विद्यापीठाचे संबंधित नियंत्रक यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१४/२०२६/व्यय-१, दि.०९.०३.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.३३/२०२६/अर्थबळ, दि.१६.०३.२०२६ रोजीच्या प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०३२०१३१७२०८९०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.20 13:18:51 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, सभापती/उपसभापती विधानपरिषद, यांचे सचिव.
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय,मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई.
५. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्यांक), यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई.
६. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
७. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
९. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१०.सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
११.मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४.अपर मुख्य सचिव, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.

१५.महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
१६.वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
१७.कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर.
१८. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
१९. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.
२०. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई.
२२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२३. जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर/परभणी/रत्नागिरी/अकोला.
२४. उपकोषागार अधिकारी, राहुरी/परभणी/दापोली/अकोला.
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
२७. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
२८. उप सचिव/सह सचिव, वित्त विभाग (व्यय-१ /अर्थसंकल्प /अर्थबळ/ऋण व हमी), मंत्रालय,मुंबई.
२९. उप सचिव, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.